अहमदनगर जिल्ह्यातील राजुर येथे दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग हे न्यायालय स्थापन करण्याबाबत व त्याकरीता आवश्यक पदे निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रंमाक: संकिर्ण १११४/११५३/प्र.क्र.२१०/कार्यासन ११
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९

<u>संदर्भ :</u> १. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. B(W)A-१९०२/१९८३, दि.२९/१०/२०१४
२.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे पत्र क्र.HKW/BLD/६९८/२०१८, दि.२०/१/२०१५
३.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्र.पदनि १०१९/प्र.क्र.३९/१९/आपुक, दि.३/८/२०१९ रोजीचे पत्र (पदनिर्मितीबाबत दि.८/७/२०१९ चे बैठकीचे कार्यवृत्त)

<u>प्रस्तावना :</u>

राज्यातील नवीन न्यायालयांची निर्मिती मा.उच्च न्यायालयाच्या शिफारशीनुसार केली जाते. राज्यात एखाद्या ठिकाणी न्यायालय सुरु करण्यासाठी प्रलंबित खटले / प्रकरणांची संख्या किमान ५०० असावी. त्याचबरोबर पायाभूत सुविधा उदा.न्यायालयीन इमारत आणि न्यायाधीशांची निवासस्थाने याची उपलब्धता असावी, या मा.उच्च न्यायालयाच्या धोरणानुसार आवश्यक सर्व निकष अहमदनगर जिल्ह्यातील राजुर येथे दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग हे न्यायालय स्थापन करण्याबाबत पूर्ण होत आहेत. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या "न्यायालय स्थापन समितीने" राजुर जि.अहमदनगर येथे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग हे न्यायालय स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संदर्भिय अनुक्रमांक १ येथील पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाला. सदर प्रस्ताव वित्त विभागास सादर केला असता उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.८/७/२०१९ रोजीच्या बैठकीत न्यायालय स्थापनेस व पदनिर्मितीस मान्यता प्राप्त झाली आहे. सबब सदर न्यायालय स्थापन करण्यास व त्यासाठी आवश्यक १६ पदे (१४ पदे नियमित व २ पदे बाह्ययंत्रणेद्वारे) निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

अहमदनगर जिल्ह्यातील राजुर येथे दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग हे न्यायालय स्थापन करण्यास व त्याकरीता पुढील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार १६ पदे (१४ पदे नियमित व २ पदे बाह्ययंत्रणेद्वारे) न्यायालय सुरु होण्याच्या दिनांकापासून निर्माण करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील राजुर येथे दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग न्यायालयासाठी आवश्यक पदे (अस्थायी)

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदसंख्या
		नियमित पदे	
१	दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग	२७७००-७७०-३३०९०-९२०-४०४५०-१०८०-४४७७० Pay in Judiciary Service	१
२	सहायक अधिक्षक	S-१५ : ४१८००-१३२३००	१
३	लघुलेखक (नि.श्रे.)	S- १४: ३८६००-१२२८००	१
४	वरिष्ठ लिपिक	S- ८: २५५००-८११००	२
५	कनिष्ठ लिपिक	S- ६: १९९००-६३२००	४
६	बेलिफ	S- ६: १९९००-६३२००	३
७	शिपाई	S- १: १५०००-४७६००	२
	एकूण नियमित पदे		**१४**
	बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा		
१	पहारेकरी	मानधन	१
२	स्वच्छक	मानधन	१
	एकूण बाह्ययंत्रणेद्वारे पदे		**२**

सदर प्रकरणी पहारेकरी व स्वच्छक यांच्या सेवा प्रत्येकी १ मनुष्य दिवस इतक्या मर्यादेत गरजेनुसार बाह्यस्त्रोताद्वारे घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. यासाठी होणारा खर्च मागणी क्र.जे-१, २०१४ न्यायदान, १०५- दिवाणी व सत्र न्यायालय, (०२) जिल्हा व सत्र न्यायाधीश, (०२) (०१) जिल्हा व सत्र न्यायाधीश (२०१४ ०१७२) (अनिवार्य) या लेखाशीर्षाखाली मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा. या अनुषंगाने निधी उपलब्धतेबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक सं. क्र. ७/१८/व्यय ५, दि.२/१/२०१८ व अनौपचारीक संदर्भ क्रमांक ६४९/आपुक, दि.२७/११/२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१३१८४४१८४७१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Yogesh Heeralal Ameta

Digitally signed by Yogesh Heeralal Ameta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f438fbbb42f2a96ef9898816253bddb762536c5eeddbe4fefb30dd49fc7eb469, serialNumber=612827d442d72142bc204c0ed5f947ca3fe2a54123e53ca2001d82866548c384, cn=Yogesh Heeralal Ameta
Date: 2019.09.13 18:42:27 +05'30'

(यो.ही.आमेटा)
विधि सल्लागार नि सह सचिव

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद
४. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई,
५. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
६. मा.राज्यमंत्री, विधि व न्याय यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
८. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, (पत्राने)
९. प्रबंधक (निरिक्षणे-१) उच्च न्यायालय (अ.शा.), मुंबई (पत्राने)
१०. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर,
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई,
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर,
१३. वित्त विभाग, कार्यासन-व्यय-५/आपुक, मंत्रालय, मुंबई,
१४. विधि व न्याय विभाग, कार्या-१२,१३,२३,व २४, मंत्रालय, मुंबई,
१५. निवड नस्ती (कार्यासन ११)